निवडणुकीत मी तिस-यांदा आमदार म्हणून निवडून आलो. 1960 साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर विधानसभेत मुंबईतून विजयाची हॅटट्रीक करणारा मी पहिला आमदार ठरलो. राजीव गांधी यांच्या कारकिर्दीत बोफोर्स तोफांच्या खरेदीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रश्नावरुन श्री. व्ही. पी. सिंग यांनी काँग्रेसचा राजीनामा दिला. 1989 च्या लोकसभा निवडणुकीची धामधुम सुरु झाली.

### असा बनलो खासदार.....

श्री. व्ही. पी. सिंह यांच्या भोवती बरेचसे विरोधी पक्ष एकत्र झाले. भारतीय जनता पक्षानेही ज्या राज्यात शक्य असेल तिथे त्यांच्याशी निवडणूक समझोता करण्याचा निर्णय घेतला. परंतु हा प्रयत्न महाराष्ट्रात यशस्वी झाला नाही. एकतर भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांच्याशी सहकार्य करण्यास जनता दलाचे काही नेते तयार नव्हते, तर दुसरीकडे काही महत्त्वाच्या जागा जनता दलाला पाहिजे होत्या. त्या देणे भारतीय जनता पार्टीला मान्य नव्हते. यात सर्वात जास्त मतभेद झाले ते उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघाबद्दल. 1985 साली मृणालताई गोरे या विधानसभेत पुन्हा निवडून आल्या होत्या तसेच त्या विरोधी पक्ष नेत्याही झाल्या होत्या. त्यामुळे त्यांनी लोकसभा निवडणूक लढवावी असा जनता दलाचा आग्रह होता तर उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघात भाजपा- शिवसेनेचे प्रभुत्व आहे म्हणून ही जागा भारतीय जनता पार्टीलाच मिळाली पाहिजे असा आमचा आग्रह होता. 1980 च्या जखमाही पूर्ण भरल्या नव्हत्या हेही वादाचे एक कारण होतेच. वेगवेगळ्या स्तरावर झालेल्या चर्चेनंतर महाराष्ट्रात जनता दलाशी समझोता होऊ शकत नाही हे स्पष्ट झाले.

कोणालाही तिकीट द्या आम्ही निवडून आणू असा स्थानिक भाजपा कार्यकर्त्यांचा दावा होता. मी उत्तर मुंबईतीलच बोरीवलीचा आमदार होतो. इथली मते भाजपाचीच आणि ती निर्णायक ठरतील असा विश्वास सर्वांना होता. पक्षातर्फे श्री. वीरेन शहा यांची उमेदवारी निश्चित झाली. आम्ही कामाला लागलो. तथापि त्यांनी ऐनवेळी निवडणूक न लढविण्याचे ठरविले. भाजपाचा उमेदवार कोण हा प्रश्न पुन्हा निर्माण झाला. आमच्या केंद्रिय नेतृत्वाने मला विचारले की ''तुम्ही तर म्हणत होता की उत्तर मुंबई भाजपा-शिवसेनेच्या ताकदीवर निवडून आणू; मग आता तुम्हीच उभे राहिले तर काय होईल?'' मी मोकळेपणाने सांगितले की ''मला श्री. वीरेन शहा यांच्यापेक्षा अधिक मते मिळतील पण मी मुंबईचा अध्यक्ष असल्यामुळे मला मुंबईमध्येच काम करण्याची तीव्र इच्छा आहे. खासदार म्हणून निवडून गेल्यानंतर सहा महिने दिल्लीत आणि सहा महिने मुंबईत अशी परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे संघटनेसाठी जितके काम करावयास पाहिजे तेवढे मी करु शकणार नाही''. परंतु ''भाजपासाठी लोकसभेची प्रत्येक जागा महत्त्वाची आहे'' असे सांगण्यात येऊन उत्तर मुंबईतून निवडणूक लढविण्याचा मला आदेशच देण्यात आला. उत्तर मुंबईतले सर्व कार्यकर्ते इरेला पेटून कामाला लागले.

निवडणूक अटीतटीची झाली. आम्ही तिघेही उमेदवार विद्यमान आमदार होतो. सहा विधानसभांपैकी एका विधानसभेचा म्हणजे बोरीवलीचा मी भाजपाचा आमदार होतो. तर जनता दलाच्या श्रीमती मृणाला गोरे या गोरेगावच्या आमदार होत्या. काँग्रेसचे उमेदवार श्री. चंद्रकांत गोसालिया कांदिवलीचे आमदार होते. मालाड व पालघर येथेही काँग्रेसचेच आमदार होते. तर वसईत जनता दलाचे आमदार होते. ज्यावेळी निवडणुकीचा निकाल लागला त्यावेळी आम्ही तिघांनीही आपापल्या विधानसभा क्षेत्रात बाजी मारली. परंतु तरीही मी प्रचंड बहुमतांनी विजयी झालो. याचे कारण मृणाल गोरे यांना गोरेगाव विधानसभेत माझ्यापेक्षा 5,262 मते जास्त मिळाली, कांदिवली विधानसभेमध्ये तेथील स्थानिक आमदार असल्याने श्री. चंद्रकांत गोसालिया यांना माझ्यापेक्षा 1,963 मते जास्त मिळाली. बोरीवली विधानसभा क्षेत्रात मी स्थानिक आमदार होतो. तिथे मी आघाडी मिळविली. ही आघाडी श्रीमती मृणाल गोरे यांच्यापेक्षा 88,996 जास्त मतांची होती, तर श्री. चंद्रकांत गोसालिया यांच्यापेक्षा 72,484 जास्त मतांची होती. मी बोरीवलीसाठी केलेल्या कामावर एक प्रकारे बोरीवलीकरांनी ते शिक्कामोर्तब केले. त्यामुळे विजयाचे पारडे पूर्णतः माझ्या बाजूला झुकले. संपूर्ण लोकसभा क्षेत्रात मी 3,62,787 मते आणि मृणाल गोरेंपेक्षा 1,30,618 चे मताधिक्य मिळवून विजयी झालो.

प्रचार काळात सर्व वृत्तपत्रांतून मृणाल गोरेच विजयी होतील, गोरे आणि राम नाईक या दोघांनी एकमेकांच्या विरोधात लढायला नको होते, त्याचा फायदा कदाचित काँग्रेसला होईल असे अंदाज व्यक्त केले जात होते. एका ज्येष्ठ पत्रकाराने तर माझ्याकडून निकालाचे भाकीत आपल्या डायरीत लिहून घेतले होते. अशा अनेक कारणांमुळे माझा तो विजय आजही मुंबईच्या राजकारणात ऐतिहासिक मानला जातो.

### खासदारकीचा ठसा

1989 ते 1996 या काळात तीन लोकसभा निवडणुका झाल्या. त्यावेळी विरोधी पक्षातील खासदार म्हणून मी काम केले. या काळात मतदारसंघातील रेल्वे, मच्छिमार, महागाई, झोपडपट्टी आदी प्रश्नांवर मी हिरीरीने विचार मांडले, आंदोलने केली. सभागृहामध्ये एक संसदपटू म्हणूनही माझी गणना होऊ लागली. 22 सप्टेंबर 1991 मध्ये टाइम्स ऑफ इंडियाने एक सर्वेक्षण करुन बातमी प्रसिद्ध केली. त्यात ''उत्तर मुंबईचे खासदार श्री. राम नाईक हे श्री. अटल बिहारी वाजपेयी, श्री. लालकृष्ण आडवाणी आणि श्री. जसवंत सिंह यांच्यानंतर



खासदारकीच्या काळात पेट्रोलियम क्षेत्रात केलेल्या कार्याचे समाधान.